# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०४/२०२२** **दिनांक २७.०४.२०२२**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.२१.०४.२०२२ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२६०/२०२२, दि.१३.०४.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

तथापी सभेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू न शकल्याने आजची सभा तहकुब करण्यात येऊन तहकुब केलेली सभा बुधवार दि.२७.०४.२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात यावी, सभेचा अजेंडा पुर्वीप्रमाणेच राहिल, असे सर्वानुमते ठरले.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दि.२७.०४.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.ना.श्री.आशुतोष अशोकराव काळे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

**१. मा.ना.श्री. आशुतोष अशोकराव काळे. अध्यक्ष**
**२. मा.ॲड. जगदीश हरिश्चंद्र सावंत, उपाध्यक्ष**
**३. मा.श्रीमती अनुराधा गोविंदराव आदिक, सदस्य**
**४. मा.ॲड. सुहास जनार्दन आहेर, सदस्य**
**५. मा.श्री. अविनाश अप्पासाहेब दंडवते, सदस्य**
**६. मा.श्री. सचिन रंगराव गुजर, सदस्य**
**७. मा.श्री. रराहुल नारायण कनाल, सदस्य**
**८. मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, सदस्य**
**९. मा.श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव, सदस्य**
**१०. मा.श्री. महेंद्र गणपतराव शेळके, सदस्य**
**११. मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, सदस्य**

**मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

समिती सदस्य मा.श्री. रराहुल नारायण कनाल, मा.श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव व मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर हे सभेस ऑनलाईन उपस्थित होते.

**यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

---

**विषय नं.०१** **दि.२६.०३.२०२२ व दि.२१.०४.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२३६** **दिनांक २६.०३.२०२२ व दि.२१.०४.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.०२** **दि.०६.०४.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२३७** **दिनांक ०६.०४.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

**१. श्री साईबाबा संस्थानतर्फे कॅन्सर युनिट सुरु करणेबाबत.**
**संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कॅन्सर युनिट सुरु करणेबाबतचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राथमिक स्तरावर कॅन्सरचे आजारावरील उपचार सुरु करणे संदर्भात**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आढावा घेऊन त्यांचे कार्यकक्षेत याबाबत कार्यवाही करावी. व त्याबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीपुढे माहितीसाठी सादर करावा, अशी उपसमितीची शिफारस होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

२. **रुग्णालयामध्ये नविन डॉक्टरांची नियुक्ती करणेपुर्वी त्यांना द्यावा लागणा-या प्रोत्साहन भत्त्याबाबत निर्णय घेणेकरीता विश्वस्त व वैद्यकिय अधिका-यांची संयुक्त कमिटी स्थापन करणेबाबत.**

संस्थानचे रुग्णालयामध्ये नविन डॉक्टरांची नियुक्ती करणेपुर्वी त्यांना द्यावा लागणा-या प्रोत्साहन भत्त्याबाबत निर्णय घेणेकरीता संस्थान अंतर्गत प्रशासकीय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीने याबाबतचा अहवाल तयार केलेला आहे. सदर अहवालाबाबत या समितीशी अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या सदस्यांशी मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा. श्रीमती अनुराधा गोविंदराव आदिक व मा.श्री.महेंद्र गणपतराव शेळके यांनी चर्चा करुन याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, अशी उपसमितीची शिफारस होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

३. **श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल यातील दराबाबत विचार करणेबाबत.**

डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत संस्थान अंतर्गत प्रशासकीय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीशी मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्रीमती अनुराधा गोविंदराव आदिक व मा.श्री.महेंद्र गणपतराव शेळके यांनी चर्चा करुन श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल यातील दराबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करावा, अशी उपसमितीची शिफारस होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

४. **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील मेडीकल/पॅरामेडीकल कर्मचा-यांसाठी सेवाप्रवेश नियमाबाबत.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालयाकरीता मेडीकल व पॅरामेडीकल पदनामांकरीता डीन, बी.जे.मेडीकल कॉलेज, पुणे यांनी तयार करुन दिलेले सेवाप्रवेश नियमांबाबत सर्व पुर्तता झालेली असल्याने याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासणी करुन नियमात बसत असेल तर मेडीकल व पॅरामेडीकल कर्मचा-यांसाठी सेवाप्रवेश नियमाबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

५. **श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) कार्यान्वित करणेबाबत.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) कार्यान्वित करणेकामी सुरु असलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करण्यात येऊन सदर योजना लवकरात लवकर सुरु करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, सदरची

योजना चालू करणेकामी ऑनलाईन Empanelment करणे गरजेचे आहे. त्याची कार्यवाही चालू आहे. तसेच सदर योजना चालू करणेकामी लागणा-या संगणकाची खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)

---

६. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत नव्याने नर्सिंग कॉलेज (B.Sc.Nursing) सुरु करणेस व त्या अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेबाबत.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४८६ अन्वये संस्थानमध्ये बी.एस्सी. नर्सिंग कॉलेज सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. व त्यानुसार प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत आलेला आहे. त्यामुळे बी.एस्सी. नर्सिंग कॉलेज सुरु करणेच्या प्रस्तावाबाबत सुरु असलेली कार्यवाही समितीपुढे सादर करुन पुढील कार्यवाही होणेबाबत, असा विषय उपसमितीपुढे सादर करणेबाबत सुचीत करण्यात आलेले होते. त्यानुसार सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसभेपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबीत असुन याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)

---

७. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत (MBBS) वैद्यकिय महाविद्यालय सुरु करणेस व त्यानुषंगिक येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४८५ अन्वये संस्थानमध्ये (MBBS) वैद्यकिय महाविद्यालय सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. व त्यानुसार प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत आलेला आहे. त्यामुळे (MBBS) वैद्यकिय महाविद्यालय सुरु करणेच्या प्रस्तावाबाबत सुरु असलेली कार्यवाही समितीपुढे सादर करुन पुढील कार्यवाही होणेबाबत, असा विषय उपसमितीपुढे सादर करणेबाबत सुचीत करण्यात आलेले होते, त्यानुसार याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसभेपुढे सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)

---

८. संस्थान कर्मचारी भरती प्रक्रियेसाठी सेवा नियम निश्चित करणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी भरती प्रक्रियेसाठी सेवाप्रवेश नियम निश्चित करणेबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करण्यात आले, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासणी करुन नियमात बसत असेल तर २००९ चे आकृतीबंधास असलेल्या मंजूरीचे अनुषंगाने शैक्षणिक संकुल या विभागाचा एकत्रित मानधनावर सेवाप्रवेश नियमाबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

९. सर्व्हे नं.१२५ व १२६ मध्ये नियोजित हॉस्पिटल व मेडीकल कॉलेज उभारणेकामी संयुक्त नकाशा करुन लेआऊट सादर करणेबाबत.

सदरची बाब ही प्रशासकीय स्तरावरील असल्याने याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करावी, अशी या उपसमितीची शिफारस होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.
(कार्यवाही- बांधकाम विभाग/मालमत्ता विभाग)

---

१०. श्री साईबाबा महाविद्यालय - मा.उप कुलसचिव यांनी दिलेल्या पत्रातील त्रृटीबाबत.

मा.उप कुलसचिव संलग्नता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील दि.२६.१०.२०२१ रोजीचे पत्राबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करावी. तसेच मा.उप कुलसचिव यांचे पत्रानुसार नुतनीकरण/नैसर्गीक वाढीबाबतचे प्रस्तावास कायम प्राचार्य किंवा संचालक, शारिरीक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व सहा.प्राध्यापक यांची नेमणूक करणेच्या अटी/शर्तीवर मान्यता देण्यात आलेली आहे. त्याकरीता श्री साईबाबा महाविद्यालयासाठी एकत्रित मानधनावर कायमस्वरुपी प्राचार्य नेमणूक करणेसाठी विशेषबाब म्हणून मान्यता मिळणेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उप कुलसचिव संलग्नता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील दि.२६.१०.२०२१ रोजीचे पत्रानुसार नुतनीकरण/नैसर्गीक वाढीबाबतचे प्रस्तावास कायम प्राचार्य किंवा संचालक, शारिरीक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व सहा.प्राध्यापक यांची नेमणूक करणेच्या अटी/शर्तीवर मान्यता देण्यात आलेली आहे. त्याकरीता श्री साईबाबा महाविद्यालयासाठी एकत्रित मानधनावर कायमस्वरुपी प्राचार्य नेमणूक करणेसाठी विशेषबाब म्हणून मान्यता मिळणेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय/सामान्य प्रशासन विभाग)

---

११. शैक्षणिक विभागात नव्याने सुरु झालेले वर्ग व कॉलेज यांचा आकृतीबंधात समाविष्ट करणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय धोरणात्मक नसून नियमीत कामकाजाचा भाग आहे. तसचे श्री साईबाबा महाविद्यालयाचे आकृतीबंधास शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/६५६/प्र.क्र.५६/का.१६, दि.१२ जुलै, २०१८ अन्वये मान्यता मिळालेली आहे. वाढलेली विद्यार्थी संख्या लक्षात घेता व कार्यभार याचा विचार करता सुधारीत संच मान्यता मिळणेकामी प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करण्यात यावा, तसेच मंजुर पदाच्या एकत्रित वेतनश्रेणी व शैक्षणिक अर्हता अंतिम करणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.
(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

---

१२. JEE / NEET / MHT CET चे मार्गदर्शन वर्ग सुरु करणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.
(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

१३. श्री साईनाथ रुग्णालयातील मंजूर पदाव्यतिरिक्त अधिक डॉक्टर्स काम करत आहे त्यांचे बाबत निर्णय घेणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मंजूर पदाव्यतिरीक्त जे डॉक्टर कन्स्लटंट म्हणून काम करतात त्यांना R.M.O म्हणून काम देण्यात यावे, सदर विषयाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय स्तरावर निर्णय घेऊन कार्यवाही करावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.०३** **श्री साईनाथ रुग्णालयातील New Male Ortho Ward व New Ortho O.T. मध्ये Oxygen, Nitrous Oxide, Air & Vaccum करीता सेंट्रल गॅस पाईपलाईनचे काम करणेबाबत.**

**निर्णय क्र.२३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील तिस-या मजल्याचे काम पुर्ण झालेले असुन तेथे नव्याने तयार करण्यात आलेल्या New Male Ortho Ward व New Ortho O.T. मध्ये Oxygen, Nitrous Oxide, Air & Vaccum करीता सेंट्रल गॅस पाईपलाईनची आवश्यकता असल्याने श्री साईनाथ रुग्णालयातील New Male Ortho Ward व New Ortho O.T. मध्ये Oxygen, Nitrous Oxide, Air & Vaccum करीता सेंट्रल गॅस पाईपलाईनचे काम करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,५९,१८३/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदर पाईपलाईनचे काम करणेकामाची अंदाजे किंमत दहा लाखापेक्षा कमी असल्याने याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०४** **श्री साईनाथ रुग्णालयाचे Blood Bank या विभागातील जुने Deep Freezer परत (Buyback) करुन नवीन 40°c Deep Freezer खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे Blood Bank या विभागाकडे असलेले Deep Freezer खरेदी करुन बारा वर्षाचा कालावधी झालेला आहे. तसेच WHO च्या गाईडलाईननुसार त्याचे आयुष्यमान संपलेले आहे. तसेच सदर फ्रिजचा Compressor खराब झाल्यामुळे तापमान व्यवस्थित मेंटेन होत नाही. त्यामुळे तो कधीही बंद पडू शकतो व रक्त/प्लाझमा साठविणेकामी अडचण येऊ शकते. तसेच दुरुस्त केल्यानंतरही तो व्यवस्थित काम देईल याची खात्री नाही. सदर फ्रिज अचानक बंद पडल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ शकते. या सर्व बाबींचा विचार करुन श्री साईनाथ रुग्णालयाचे Blood Bank या विभागातील जुने Deep Freezer परत (Buyback) करुन नवीन 40°c Deep Freezer खरेदी करणे कामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७,४४,४९३/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच नवीन 40°c Deep Freezer खरेदी करणेकामी अंदाजे किंमत दहा लाखापेक्षा कमी असल्याने याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०५** **कोरोना आजाराच्या पार्श्वभुमीवर असलेल्या संचारबंदीमुळे उशीराने सादर झालेल्या कायम कर्मचा-यांच्या वैद्यकिय बीलाचा परतावा करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय देखभाल नियमावली-१९९९ मधील कलम ११(१) नुसार वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मागण्या वैद्यकिय देखभाल किंवा उपचार पुर्ण झाल्यापासून तीन महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक आहे. तथापी कोरोना आजाराच्या दुस-या लाटेच्या पार्श्वभूमीवर असलेल्या संचारबंदीमुळे श्री.सिरसट यांना वैद्यकीय बिले जमा करण्यास विलंब झालेला आहे, ही अपवादात्मक बाब विचारात घेऊन श्री.संतोष अर्जुन सिरसट, वरिष्ठ क्ष-किरण तंत्रज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी सादर केलेले वैद्यकीय बिल रक्कम रु.१०,३९६/-मात्र पैकी रक्कम रु.९,९२८/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०६** **www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर भाडे तत्वावर घेणेकामी M/s ESDS Soft. Sol.Pvt.Ltd यांना देणेत आलेल्या कार्यादेशास GeM Portal वर नोंदणी व खरेदी प्रक्रिया राबविणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेबाबत.**

निर्णय क्र.२४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर भाडे तत्वावर घेणेकामी M/s ESDS Soft. Sol. Pvt. Ltd. यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३०.०४.२०२२ अखेर संपुष्टात येत आहे. याबाबत GeM Portal व्दारे खरेदी प्रक्रिया करणेकामी नोंदणीची कार्यवाही M/s Stellar, Pune यांचेमार्फत करुन घेण्यात येत असुन नोंदणीची कार्यवाही पुर्ण होऊन खरेदी प्रक्रिया दि.३०.०४.२०२२ पर्यंत पुर्ण होणे शक्य होणार नाही. त्यामुळे वेबसाईट कार्यान्वीत राहणेसाठी अडचण येऊ नये याकरीता M/s ESDS Soft. Sol. Pvt. Ltd. यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील नमुद अटी-शर्ती व दराप्रमाणे पुढील आदेश होईपावेतो मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच , संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर भाडे तत्वावर घेणे ऐवजी स्वत:चा सर्व्हर घेणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

विषय नं.०७ मौजे शिर्डी येथील श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम. मशीनचे जागा वापरास मुदतवाढ देणेबाबत मा.शाखाधिकारी, सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचेकडील जा.नं.शिर्डी/२०२१-२२/३-१७ दि.१४.०३.२०२२ रोजीचे पत्र.

निर्णय क्र.२४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५ मधील श्री साईबाबा हॉस्पिटलचे पुर्वेकडील बांधीव जागा क्षेत्र ९.६"x१०.३"(९७.३७ चौ.फुट) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना ए.टी.एम. चे वापरासाठी देणेकामी सध्या आकारण्यात येणारे दरमहा भाडे रु.१,५९५/- हे अत्यल्प असल्याने रेडीरेकरचे दरानुसार भाडे देणेबाबत शाखाधिकारी, सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा-शिर्डी यांचेशी चर्चा करावी. व त्यानुसार दरमहा भाडे रक्कम ठरवुन व विद्युत बील मीटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारुन पुर्वीच्या अटी व शर्तीवर दि.०६.०६.२०२२ ते दि.०५.०५.२०२३ या ११ महिने कालावधीसाठी मुदवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच लिव्ह अॅन्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

विषय नं.०८ मालमत्ता विभागाकडील कार्यरत असलेले कंत्राटी सल्लागार श्री.सुरेश सुधाकर भालेराव, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा दि.१९/०८/२०२० व दि.११/०१/२०२२ रोजीचा अर्ज.

निर्णय क्र.२४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मालमत्ता विभागाकडे कंत्राटी सल्लागार म्हणून कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून प्रचलित पध्दतीने एकत्रित रक्कम रु.२५,०००/-मात्र मासिक मानधनावर कार्यरत असलेले श्री.सुरेश सुधाकर भालेराव, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे दि.०५.०९.२०२० ते दि.०४.०८.२०२१ या ११ महिने कालावधीसाठीचे मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच दि.०५.०८.२०२१ पासुन पुढील ११ महिने कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून एकत्रित रक्कम रु.२५,०००/-मात्र मासिक मानधनावर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच कंत्राटी सल्लागार श्री.सुरेश सुधाकर भालेराव, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना फक्त कामावर हजर असलेल्या कालावधीतील मानधन आदा करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

विषय नं.०९ श्री साईबाबा महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता सर्व शाखेचे संदर्भ ग्रंथ, कादंबरी, शब्दकोष व पुस्तके खरेदीबाबत.

निर्णय क्र.२४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, महाविद्यालयाचे ग्रंथालयात आजपावेतो क्रमिक पुस्तके खरेदी करण्यात आलेली आहेत. तथापी त्या तुलनेने संदर्भ पुस्तके व ग्रंथ खरेदी करण्यात आलेले नाहीत.

विद्यापीठामार्फत महाविद्यालयात पाहणी करण्यासाठी वेळोवेळी येणा-या समिती सदस्यांनी ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ, कादंबरी, शब्दकोष व पुस्तके मोठया प्रमाणात उपलब्ध ठेवणेबाबत सुचना केलेल्या आहेत. तसेच सध्या महाविद्यालय ऑफलाईन पध्दतीने पुर्ण क्षमतेने सुरु असुन विद्यार्थी ग्रंथालयातुन पुस्तकांची मागणी करत आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन श्री साईबाबा महाविद्यालयाचे ग्रंथालयासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ, कादंबरी, शब्दकोष व पुस्तके खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६,५४,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

---

**विषय नं.१०** श्री साई प्रसादालय करीता नवीन आटा युनिट खरेदी करणेकामी सुधारीत अंदाजपत्रकिय खर्चास तसेच केलेली निविदा रद्द करुन फेर ई-निविदा मागविणेबाबत.

**निर्णय क्र.२४५** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयात चपाती व पुरीचा आटा तयार करणेकरीता नविन अत्याधुनिक डस्ट विरहीत आटा युनिट खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.तुलसी अॅग्रो इंजि.मेक, प्रा.लि. राजकोट, गुजरात यांचे निम्नतम दर रक्कम रु.३६,२७,७५०/-मात्र हे अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४,९३,७५०/- पेक्षा ४५% अधिक असल्याने सदरची ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन याकामी विहीत पध्दतीने फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच याकामी येणा-या सुधारीत अंदाजपत्रकिय रक्कम रु.३५,८५,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.११** श्री साई प्रसादालयातील एअर व्हेंटीलेशन यंत्रणा व आय टी विभाग सर्व्हर प्रेसिजन ए.सी.यंत्रणा नवीन बसविणेकामी तांत्रिक सल्लागार नेमणूक करणेबाबत.

**निर्णय क्र.२४६** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील एअर व्हेंटीलेशन यंत्रणा व आय.टी. विभाग सर्व्हर प्रेसिजन ए.सी.यंत्रणा सततचे वापराने वारंवार खराब होत असल्याने तसेच त्यांची कार्यक्षमताही कमी झालेली असल्याने त्यांचे जागी नवीन यंत्रणा बसविणेकामी या क्षेत्रातील तज्ञ तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेसाठी विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द करुन दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.१२** दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी हॉलमध्ये वातानूकुलित (Air Conditioner) यंत्रणा बसविणेस व या कामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२४७** यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीसाठी असलेला हॉल सर्व बाजूंनी बंदिस्त असल्याने जास्त वेळ कॅश काऊंटींग सुरु राहिल्यास उपस्थित कर्मचा-यांना उकाडयाचा त्रास होते. याकरीता दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी हॉलमध्ये वातानूकुलित (Air Conditioner) यंत्रणा बसविणेकामी मेकॅनिकल विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१०,७२,८०५/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी विद्युत सप्लाय करीता इलेक्ट्रीक केबल खरेदीकामी विद्युत विभागामार्फत विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६,०५,०५४/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग/विद्युत विभाग)

---

**विषय नं.१३** आर्थिक अनुदान मागणीकरिता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.

**निर्णय क्र.२४८** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये वैयक्तीक आर्थिक अनुदान देणेबाबत स्पष्ट तरतुद नाही. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.३०.०१.२०१९ रोजी **'Shri Sai Baba Sansthan Trust, shall not disburse**

**an amount of the Trust for other purpose than routine expense' असे आदेश दिलेले आहेत. सबब दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीत आलेले आर्थिक अनुदान मागणी अर्ज नामंजुर करुन फाईल करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.१४** पेठ वडगाव, कोल्हापूर येथे श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाबाबत.

**निर्णय क्र.२४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. तसेच मा.व्यवस्थापन समिती सदस्य व संस्थानचे अधिकारी यांची समिती गठीत करण्यात येऊन या समितीने श्री साईबाबांच्या पादुका दर्शन सोहळयाकरीता बाहेर देणेकामी नियमावली तयार करावी. व त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१५** सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी १९ किलो क्षमतेचे व्यायसायिक गॅस सिलेंडर खरेदी (रिफीलींग) करुन घेणेबाबत.

**निर्णय क्र.२५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना चहा, कॉफी, दुध इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणेकामी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी १९ किलो क्षमतेचे व्यायसायिक गॅस सिलेंडर (रिफीलींग) खरेदी करणेकामी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील श्री साई गणेश गॅस एजन्सी, शिर्डी या दरधारकाने देऊ केलेली सर्वात जास्तीची सवलत प्रती सिलेंडर रक्कम रु.२६१/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, सदरचे गॅस सिलेंडर हे संस्थान व्यवसाय करण्यासाठी वापरत नसल्याने Commercial Rate ऐवजी Domestic Rate ने सिलेंडर (रिफीलींग) खरेदी करणेबाबत कार्यवाही चालू आहे.**

**(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)**

---

**विषय नं.१६** विद्युत विभागाकरीता दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स कामाकरीता लागणारे इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेबाबत.

**निर्णय क्र.२५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.१२.२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३८/१ अन्वये संस्थानचे विद्युत विभागाकडील दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स करीता आवश्यक असणारे मटेरीअल खरेदी करणेकामी ३२ आयटेम्सकरीता पुरवठा आदेश देण्यास व उर्वरीत ४५ आयटेम्सकरीता प्राप्त झालेले दर हे खरेदी नियमावलीतील ३.१.२.१ या नियमाप्रमाणे अंदाजीत किंमतीपेक्षा (+) १०% जास्त असल्याने याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. असा निर्णय झालेला आहे. तथापी ३२ पैकी १६ आयटेम्ससाठीचा पुरवठा करण्यास न्युनतम दरधारकांनी असमर्थता दर्शविलेली आहे. त्यामुळे संस्थानचे विद्युत विभागाकडील दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स करीता आवश्यक असणारे उपरोक्त प्रस्तावातील नमुद अंदाजीत किंमतीपेक्षा (+) १०% जास्त दर असलेले ४५ आयटेम्स व न्युनतम दरधारकांनी पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविलेले १६ आयटेम्स असे एकुण ६१ आयटेम्स इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६५,६१,२३०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **श्री साईनाथ रुग्णालयातील Ortho O.T. या विभागाकरीता Cordless Drill Machine with All attachment खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Ortho O.T. मध्ये हाडांच्या शस्त्रक्रिया करतांना हाडे कट करण्याकरीता तसेच हाडांना छिंद्र पाडण्यासाठी वापरण्यात येणारे Cordless Drill Machine हे सन २०११ मध्ये खरेदी करण्यात आलेले असून त्याचे आयुष्यमान संपलेले असल्याने ते व्यवस्थीत काम देत नाही. याकरीता श्री साईनाथ रुग्णालयातील Ortho O.T. या विभागाकरीता ०१ नग Cordless Drill Machine with All attachments (next 5 year CAMS) खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन/दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७,६२,४३२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.६,०५,३१८/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील नमुद २२ कर्मचाऱ्यांना (रुग्ण २६) देय असलेली रक्कम रु.६,०५,३१८/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१४,७७,२०५/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील नमुद १७ कर्मचाऱ्यांना (रुग्ण २२) देय असलेली रक्कम रु.१४,७७,२०५/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज, श्रीरामपूर येथील बीएचएमएस विद्यार्थी यांना संस्थानचे रुग्णालयात अनुभवासाठी इंटर्नशीपकरीता परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालयात इंटर्नशीपकरीता परवानगी मिळणेकामी अर्ज करणा-या होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज मधील विद्यार्थ्यांना संस्थानचे रुग्णालयात आवश्यकतेनुसार व गरजेनुसार इंटर्नशीपकरीता परवानगी देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ बंद करण्यात आलेल्या ह्दयशस्त्रक्रिया व इतर आजाराचे वैद्यकीय आर्थिक अनुदान सुरु करणेबाबत.

निर्णय क्र.२५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली बनवितांना ज्या शस्त्रक्रिया व उपचार संस्थानचे रुग्णालयात होतात तसेच केंद्र व राज्य शासनाच्या जीवनदायी / महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना किंवा तत्सम योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया वगळुन आर्थिक अनुदान देणेचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते. परंतु या योजनेअंतर्गत एकुण ९७२ शस्त्रक्रिया केल्या जातात. तर संस्थानच्या रुग्णालयात फक्त २७२ शस्त्रक्रिया केल्या जातात. विशेषत: लहान मुलांच्या शस्त्रक्रिया केल्या जात नाही. जे आजार सुधारीत नियमावलीमधुन वगळण्यात आलेले आहेत त्या आजाराने ग्रस्त असलेले पुणे, मुंबई व महाराष्ट्रातील इतर ठिकाणचे रुग्ण संस्थानचे रुग्णालयात उपचारासाठी येऊ शकत नाही. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या जीवनदायी/महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना किंवा तत्सम योजनेमध्ये ब-याच आजार/शस्त्रक्रियांचा समावेश नसल्याने व विशेषत: लहान मुलांच्या शस्त्रक्रिया होत नसल्याने अशा आजाराने ग्रस्त असलेले गरीब व गरजु रुग्ण संस्थानमार्फत देण्यात येणा-या वैद्यकीय आर्थिक अनुदानापासून वंचित राहतात. या सर्व बाबी विचारात घेऊन संस्थानचे सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये ह्दय शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, मेंदूची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार या तीन आजारांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ डॉ.महेंद्र केदराज नेमनाथ, वैद्यकीय अधिकारी, स्त्रीरोगतज्ञ, साईनाथ रुग्णालय, यांचे प्रोत्साहन भत्ता मिळणेबाबतचा दि.१९.११.२०२१ रोजीचे विनंती अर्जाबाबात.

निर्णय क्र.२५७ सदरचा प्रस्ताव तहकुब ठेवण्यात आला. (कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे मुदतवाढीबाबत.

निर्णय क्र.२५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना संस्थानचे मालमत्ता विभागाकडे कंत्राटी सल्लागार म्हणून प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून पुर्वीचेच एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.३०,०००/-प्रमाणे कंत्राटी कर्मचारी म्हणून दि.१९.०९.२०२० ते दि.१८.०९.२०२१ या एक वर्ष कालावधीचे मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच दि.१९.०९.२०२१ ते दि.१८.०४.२०२२ या सात महिने कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून पुर्वीचेच एकत्रित मासिक मानधन रक्कम रु.३०,०००/-प्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच कंत्राटी सल्लागार श्री. कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना फक्त कामावर हजर असलेल्या कालावधीतील मानधन आदा करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ सन २०२२-२३ या कालावधीकरीता वाहन विभागाकडील १२० वाहनांचा विमा नुतनीकरणाबाबत.

निर्णय क्र.२५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०१.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार संस्थानचे वाहन विभागाकडील १२० वाहनांचा दि.०१.०४.२०२२ ते दि.३१.०३.२०२३ या कालावधीकरीता विमा नुतनीकरण करणेकामी चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील निम्नतम दरानुसार वाहन निहाय विमा नुतनीकरण

करण्यात येऊन याकामी झालेल्या रक्कम रु.३२,०७,९४१/-मात्र खर्चाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.९ नियोजीत शैक्षणिक संकुल प्रकल्पातील इमारतीचे आतील बाजुचे ओपन डक्टला विद्यार्थ्यांचे सुरक्षिततेकरीता लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेकामी येणा-या खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२६० यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत शैक्षणिक संकुल प्रकल्पातील इमारतीचे आतील बाजुचे ओपन डक्टला विद्यार्थ्यांचे सुरक्षिततेकरीता सुरक्षा जाळी (safety net) बसविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोटेशन/ई-निविदा मागवून सदरचे काम तातडीने पुर्ण करुन घ्यावे, व कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले. लोखंडी ग्रील बसविते वेळी इमारतीचे मुळ सौदर्याला बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी, अशी सुचना देण्यात आली.
(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग/बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१० संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव सन-२०२२ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापुर ता.श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्विकारणेबाबत.

निर्णय क्र.२६१ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव सन-२०२२ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणी कामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील निम्नतम निविदाधारक मे.कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांनी सदरचे काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन त्यांचे नावाचा काळया यादीत समावेश करण्यात आलेला आहे. तसेच सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने याकामी कमी कालावधीची ई-निविदा प्रसिध्द करुन मागविण्यात आलेल्या ई-निविदेतील निम्नतम निविदाधारक साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापुर, ता.श्रीरामपूर यांनी सदरचे पुर्ण केलेले असुन त्याकामी आलेल्या खर्चाची रक्कम रु.२०,११,९८७/-मात्रची नोंद घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.११ श्री साई प्रसादालयाकरीता नविन डीश वॉशिंग मशिन (दोन नग) खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकरीता दोन नग डीश वॉशिंग मशिन सन २००९ मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. तथापी सततच्या वापराने दोन्हीही डीश दोन नग वॉशिंग मशिन्सची झिज झाल्यामुळे अनेक स्पेअर पार्ट, ॲटो फंक्शन वारंवार बंद पडत असुन प्लेट धुण्याचे कामामध्ये व्यत्यय येऊन गैरसोय होत आहे. तसेच प्लेट पुर्वीसारख्या स्वच्छ होत नाहीत. मेन्टनन्स खर्च दिवसोदिवस वाढत आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन श्री साई प्रसादालयाकरीता नविन डीश वॉशिंग मशिन (दोन नग) खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,७१,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच नविन मशिन्स खरेदी केल्यानंतर जुने मशिन्स जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.
(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे CAMC करीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६३** यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे तसेच रुग्णालयातील रुग्णांचे सोई सुविधेकरीता संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय या इमारतीमध्ये बसविण्यात आलेल्या लिफ्ट १० ते १२ वर्षापासून कार्यान्वीत असून सततच्या वापरामुळे त्यामधील बरेचसे पार्ट बदलणे आवश्यक आहे. याकरीता संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील एकुण ३२ लिफ्टचे एकत्रित तीन वर्षाचे कालावधीकरीता कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.५८,३३,६४८/-मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. **(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता जुने Fully Automatic Biochemistry Analyser परत (Buyback) करुन नविन Fully Automatic Biochemistry Analyser खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६४** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता वापरात असलेले दोन नग Fully Automatic Biochemistry Analyser मशीनपैकी एक मशीन सन २०१२ मध्ये खरेदी करण्यात आलेले असुन WHO च्या गाईडलाईन नुसार सदर मशीनचे आयुष्यमान ८ वर्ष असुन ते सन २०२० मध्ये संपुष्टात आलेले आहे. याकरीता श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता एक नग Fully Automatic Biochemistry Analyser खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३५,९९,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच जुन्या Fully Automatic Biochemistry Analyser ची घसारा किंमत रक्कम रु.५०,०००/-पेक्षा जास्त येत असल्यामुळे याकामी मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले. **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **ऑगस्ट-२०२२ सत्रासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राज्यशासनाचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत व प्रवेशामध्ये संस्था स्तरावरील २० टक्के जागा मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेमधुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.२६५** यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट-२०२२ या सत्राकरीता १०० टक्के जागा मध्यवर्ती प्रवेश पध्दती (CAP) व्दारे भरण्यास मान्यता देण्यात आली.
**(कार्यवाही- औद्योगिक प्रशिक्षण संस्था)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **श्री साईबाबा महाविद्यालय-शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये नवीन अभ्यासक्रम विशेषस्तर विषय व नवीन उपक्रम सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६६** मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संस्थानचे महाविद्यालयामध्ये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात नविन अभ्यासक्रम, विशेषस्तर अभ्यासक्रम व उपक्रम सुरु करणे संदर्भात सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन श्री साईबाबा महाविद्यालय-शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये बी.एस्सी. (मायक्रोबायोलॉजी) व बी.बी.ए. हे दोन नविन अभ्यासक्रम तसेच इंग्रजी व अर्थशास्त्र हे दोन विशेषस्तर विषय सुरु करणेकामी विद्यापीठाकडे प्रस्ताव दाखल करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडील दि.२४.०४.२०२२ रोजीचे प्रकटनानुसार (जाहिरातीनुसार) श्री साईबाबा संस्थानचे विधी महाविद्यालय, महिला महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान) व रात्र महाविद्यालय (कला व

वाणिज्य) या तीन नवीन महाविद्यालयाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावेत, असे ठरले. याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे संबधीत विभागाकडून तात्काळ प्राप्त करुन घेण्यात यावी, विद्यापीठाच्या नियमानुसार प्रस्तावित होणारे शुल्क RGTS व्दारे आदा करणे, फिक्स डिपॉझिटच्या पावत्या करणे इत्यादी कामे लेखाशाखेमार्फत तातडीने करुन घेण्यात येऊन, विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत म्हणजेच दि.३०.०४.२०२२ अखेर परिपुर्ण प्रस्ताव दाखल करण्यात यावा, असे ठरले.

तसेच स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र (MPSC, UPSC) व प्रवेश परिक्षा मार्गदर्शन केंद्र (NEET, JEE,MHT-CET) सुरु करणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१६ संस्थानमार्फत साजरा करण्यात येणारा श्री गुरुपोर्णीमा उत्सव-२०२२ तसेच पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणे व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१३,८७,०००/-मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता देणे.

निर्णय क्र.२६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव, दिपावली, नाताळ, उन्हाळा व पावसाळयाचे कालावधीत तसेच वेळोवेळी आयोजित विविध कार्यक्रमाचे वेळी साईभक्तांचे सुविधेसाठी मंडप व्यवस्था केली जाते. याकामी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरकेडींग, स्टेज, कनात, कमानी इत्यादी अनुषंगीक व्यवस्था करण्यात येते. त्यानुसार संस्थानमार्फत साजरा करण्यात येणारा श्री गुरुपोर्णीमा उत्सव-२०२२ तसेच पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१३,८७,०००/-मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१७ श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील रुग्णांना ने-आण करणेकामी फोर्स कंपनीची बीएस-६ प्रकारातील ट्रॅक्स रुग्णवाहीका खरेदी करणेचा विषय निरस्त करणेबाबत.

निर्णय क्र.२६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील रुग्णांना ने-आण करणेकामी फोर्स कंपनीची बीएस-६ प्रकारातील ट्रॅक्स रुग्णवाहीका खरेदी करणेस तत्कालीन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२३.११.२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८१ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तथापी सदरची रुग्णवाहिका संस्थानला देणगी स्वरुपात मिळालेली असल्याने मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२३.११.२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८१ निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१८ श्री साई सच्चरित्र भावानुवाद (हिंदी-खंड ०१ व खंड ०२) या ग्रंथाच्या छपाईसाठी बार कोड मिळणेकामी देणगीदार तथा लेखक श्री.दिलीप पवार (काका) पुणे यांचे पत्रव्यवहाराबाबत.

निर्णय क्र.२६९ सदरचा प्रस्ताव नामंजुर करण्यात आला. तसेच यापुढे संस्थान प्रकाशित ग्रंथांचा भावानुवाद करण्यास परवानगी देण्यात येऊ नये, असे ठरले. (कार्यवाही- प्रकाशने विभाग)

---

मा.विश्वस्तांनी आयत्या वेळी घेतलेले ठराव

आयत्या वेळेचा विषय नं.१९
ठराव क्र.२७० संस्थानचे विविध विभागाशी संबधीत शासन स्तरावर प्रलंबीत असणा-या प्रस्तावांना शासन मान्यता मिळणेकामी पाठपुरावा करणेत यावा. याकरीता सन-२००९ चे आकृतीबंधातील मंजुर पदानुसार

संस्थानचे मुंबई कार्यालय येथे विशेष कार्य अधिकारी नियुक्त करणेकामी पाठपुरावा करणेत यावा. आवश्यकता असल्यास मा.व्यवस्थापन समितीची सभा संस्थानचे मुंबई कार्यालय येथे आयोजित करण्यात यावी. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/सभाकामकाज विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२०

ठराव क्र.२७१ कॅश काऊंटींग बाबत सर्व मा.समिती सदस्य यांना माहिती देण्यात यावी.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२१

ठराव क्र.२७२ श्री साईबाबा संस्थानचे नावाशी साम्य असणा-या वेबसाईट असुन याव्दारे देणगी जमा केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत सायबर गुन्हे शाखा, अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्यात यावा. वेबसाईट, फेसबुक, इन्स्टाग्राम यावर साई नावाने किती अकाऊंट ओपन आहेत याची यादी तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावी.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग/विधी विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२२

ठराव क्र.२७३ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, आपत्कालीन परिस्थितीत वापरणेकामी संस्थानकडे आपत्कालीन निधीची तरतुद नाही. याकरीता संस्थानचे एकुण उत्पन्नातील ठरावीक रक्कम ही 'आपत्कालीन निधी' म्हणून ठेवणेबाबत तसेच या निधीच्या विनियोगाबाबत राज्य सरकारचे निर्देश याबाबत माहिती घेऊन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात येईल.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२३

ठराव क्र.२७४ संस्थानचे मुंबई कार्यालय येथील इमारतीच्या संदर्भात मागील मा.व्यवस्थापन समितीने सुरु केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन या संदर्भात सद्यस्थितीत करावयाच्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात यावा. (कार्यवाही-मालमत्ता विभाग /बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२४

ठराव क्र.२७५ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस माहिती दिली की, संस्थान मालकीचे विविध ठिकाणचे जागा/गाळे खाजगी व्यक्ती/संस्था यांना व्यवसायाकरीता वापरासाठी देण्यात आलेले आहेत. तथापी याकामी आकारण्यात येणारे भाडेदराची रक्कम अत्यल्प असल्याने निदर्शनास येते. याकरीता त्यांचेकडून मिळणा-या भाडेदराचे मुल्यांकन करुन सध्याचे बाजार भावानुसार संस्थानचा फायदा बघुन आकारावयाच्या सुधारीत भाडेदराबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात येईल. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२५

ठराव क्र.२७६ संस्थानचे विविध विभागामार्फत जे उपक्रम राबविले जातात त्याकरीता प्रशिक्षीत मनुष्यबळाची आवश्यकता असते. अशा ट्रेडला प्राधान्य देऊन नवीन टेक्नीकल तसेच नॉन टेक्नीकल ट्रेड संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सुरु करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२६

ठराव क्र.२७७ संस्थानचे रुग्णालयामध्ये डोळयांच्या शस्त्रक्रियेकरीता अत्याधुनिक लेझर मशिन खरेदी करणे तसेच यासाठी आवश्यक असणारे तज्ञ डॉक्टर व तंत्रज्ञ घेणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२७**

**ठराव क्र.२७८** विविध वर्तमानपत्र तसेच सोशल मिडीयामधुन संस्थान संबंधीत बातम्या प्रसिध्द होत असतात. अशा बातम्यामधुन संस्थानची बदनामी होत आहे, असे अधोरेखीत होत असेल तर याबाबत कायदेशीर कार्यवाही विधी विभागामार्फत करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत सादर करणेत यावा.

**(कार्यवाही-जनसंपर्क कार्यालय/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२८**

**ठराव क्र.२७९** संस्थानचे विविध न्यायालयात प्रलंबीत असलेल्या प्रकरणांची यादी तयार करण्यात यावी. मागील मा.व्यवस्थापन समितीने अशा प्रकारची न्यायालयीन प्रकरणे तडजोडी अंती निकाली काढलेली आहेत. त्याच धर्तीवर प्रकरणे निकाली काढणेकामी कार्यवाही करणेत यावी.

**(कार्यवाही- विधी विभाग/कामगार विभाग/ सामान्य प्रशासन विभाग/श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२९**

**ठराव क्र.२८०** शुध्द तुप खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली आहे. तथापी याकामी प्रसिध्द करण्यात येणा-या ई-निविदेतील अटी शर्तीमध्ये निविदाधारकाची वार्षिक उलाढाल १०० कोटी असावी, असा बदल करण्यात यावा. जेणे करुन चांगल्या प्रतिचे तुपाचा पुरवठा होईल व सर्वंकश (Global) कंपन्या निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होतील.

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३०**

**ठराव क्र.२८१** संस्थानला खाद्यतेलाचा पुरवठा करणारे पुरवठादार मे.रामनाथ जगन्नाथ ॲन्ड कंपनी यांचे प्रतिनिधी आजचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी सुर्यफुल ऐवजी सोयाबिन तेलाचा पुरवठा करण्यास तयार असल्याचे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत माहिती दिली की, सदर पुरवठादार यांनी सुर्यफुल तेलाचा पुरवठा करण्यास असमर्थ असुन याबाबत संस्थानने मार्गदर्शन करावे अशा संदिग्ध स्वरुपाचे पत्र संस्थानला पाठविले आहे. या संदर्भात निर्णय घेणेबाबत सदर पत्रामध्ये कुठल्याही प्रकारची स्पष्टता नाही. तसेच ई-निविदेतील नमुद अटी-शर्तीचे पालन करणार किंवा कसे याबाबत आकलन होत नाही. यावर सभेमध्ये सर्वांगीन चर्चा होऊन, ई-निविदेतील नमुद अटी शर्तीनुसार संस्थानचे हितास बाधा न येता याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करावी, असे ठरले.

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**वरील निर्णय/ठराव क्र.२३६ ते २८१ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ.०९.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.) | (ना.आशुतोष अशोकराव काळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**